## निशाणी क्र. २५ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.१ हे अशिक्षीत, अडाणी व वयस्कर असल्याने तसेच त्यांना उच्च रक्तदाब, मधुमेह वगैरे आजार असल्याने त्यांना आजारपणामुळे वकीलपत्र देणे, तसेच आवश्यक ती कागदपत्रे व माहिती घेऊन वकीलांशी संपर्क साधता आला नाही व जरुर त्या कागदपत्रांची पुर्तता न करता आल्यामुळे प्रतिवादींना वादीच्या दाव्यास कैफियत मुदतीत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादीस कैफियती दाखल करणेस विलंब झाला आहे.

२. यातील प्रतिवादी हे जाणुनबुजून अथवा मुद्दामपणे कैफियत देणेस विलंब केलेला नाही. त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब न्यायाचे दृष्टीने माफ करणेत येऊन यासोबत दिलेली कैफियत दाखल करुन घेणेत यावी. सदरची कैफियत दाखल करुन न घेतलेस या प्रतिवादीच्या कायदेशीर न्याय व हक्कांवर गदा निर्माण होऊन या प्रतिवादीचे पैशाने न भरुन येणारे कायमचे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. प्रतिवादी नं.१ यांनी कैफियत दाखल करुन घेतल्यास सदरचे काम गुणदोषावर चालुन न्यायदान करणेस मदतच होणार आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार सदर प्रतिवादीस कायदेशीर संधी देणे आवश्यक आहे. तरी सदर प्रतिवादी नं.१ यांची कैफियत देणेस झालेला विलंब न्यायाचे दृष्टीने माफ करणेत यावा व या अर्जासोबत दिलेली कैफियत दाखल करुन घेणेत यावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादींचे विधीज्ञांनी हरकत घेऊन आपले म्हणणे दाखल केले. त्यांच्या मते प्रतिवादी यांचा अर्ज व त्यामधील संपुर्ण मजकुर धादांत खोटा व लबाडीचा असुन तो या वादीस मुळीच मान्य नाही कबुल नाही. अर्जासोबत कोणताही पुरावा नाही. अर्ज मुदतीत नाही. सबब अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं.१

यांनी त्यांना आजारपणामुळे वकीलपत्र देणे, तसेच आवश्यक ती कागदपत्रे व माहिती घेऊन वकीलांशी संपर्क साधता आला नाही व जरुर त्या कागदपत्रांची पुर्तता न करता आल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. सदरचा दावा हा वादीने वाटप होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर आल्यास सदरचा दावा हा गुणदोषावर निकाली करणेस मदत होणार आहे. यावरून वादीच्या सांगण्यात सत्यता असल्याचे पटते व सदरचे कारण योग्य वाटते. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर आल्यास दाव्याची निर्णीती करण्यास मदतच होणार आहे. झालेला विलंब हा कॉस्टच्या स्वरुपात भरुन काढता येऊ शकतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी नं.१चा अर्ज रक्कम रुपये १०००/– चे कॉस्टवर मंजुर करण्यात येत आहे.

२. झालेला विलंब माफ करण्यात येतो.

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.09.05 17:37:07 +0530

आटपाडी.　　　　　　**( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक ०५/०९/२०२३.　　　　सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - A. A. Jamadar |
| Court | - Jt. CJJD and JMFC, Atpadi. |
| Date | - 05.09.2023 |
| Order signed by the Presiding Officer on | - 05.09.2023 |
| Order uploaded on | - 05.09.2023 |